# श्वानांच्या वाईट सवयी (डॉ.भगत लेख जोडा)

**पा**ळीव श्वानांना बऱ्याचदा काही वाईट सवयी लागलेल्या आढळून येतात. या वाईट सवयी कोणत्या? श्वानपालकाला जी गोष्ट आवडत नाही, तीच त्याने पुन्हा पुन्हा करणे; एखादी आज्ञा दिल्यावर ती न पाळणे. असे वारंवार झाल्यावर श्वानपालक त्यांच्या श्वानांना मारतातही. तरी ते श्वान तसेच वागत राहतात. नेहमी दिसणारे दृष्य म्हणजे श्वानपालक बाहेरून घरी आल्यावर त्यांचा आवडता श्वान चक्क पालकाच्या अंगावर दोन्ही पाय टाकतो व मागील पायांवर उभा राहतो. त्याचे पाय जर मातीने वा चिखलाने बरबटलेले असतील तर श्वानपालकाचे कपडे खराब होतात. आपला मालकच नाही, तर इतर कोणी पाहुणा माणूस देखील घरात आल्यावर हा श्वान त्याचे तसेच स्वागत करण्याची शक्यता असते. अशा वेळी तो अनोळखी माणूस घाबरून जाणाची व ओरडा आरडा करण्याची शक्यता असते. तो घाबरण्याने श्वानाचे दात वा नखे त्या माणसाला लागण्याची शक्यता असते. टोकदार नखांनी कपडेही फाटू शकतात, अंगावर ओरखडे येतात ते वेगळेच. या सवयी लहानपणीच घालविल्यास ते त्रासदायक ठरत नाही.

श्वानाच्या वाईट सवयी जाण्यासाठी काही श्वानपालक त्याला मारतात. पण ही शिक्षा कशाबद्दल आहे हे समजण्याची क्षमता श्वानात नसल्याने त्याच्या वागणुकीत फरक पडण्याची शक्यता कमी असते. म्हणून या वाईट सवयी पिलाला लागूच नयेत व असतील तर त्या चालू राहू नयेत म्हणून श्वानपालकाने खबरदारी घ्यावी. मालकाच्या अंगावर उडी मारण्यासाठी श्वान मालकाजवळ आला की त्याला तसे करण्यापासून परावृत्त केले पाहिजे. त्याच्या डोक्यावर हात ठेवून, पाठीवर हात ठेवून त्याच्या गळ्यातील पट्टा पकडून ही अंगावर पाय टाकण्याची कृती श्वानास करू देऊ नये. यावेळी तो अंगावर उडी घेण्याच्या बेतात असतानाच 'बॅड डॉग', 'नो', किंवा मराठीत 'नाही- अंगावर उडी मारायची नाही', असे म्हणावे. त्याने श्वानपालकाचे ऐकल्यावर त्याच्या अंगावर थोपटून शाबासकी द्यावी. ही कृती आज्ञेसह आपण सतत १०-१५ दिवस केल्यास आपल्या श्वानामध्ये आपणास नक्कीच फरक जाणवू लागतो. काही दिवसांनंतर तो तुमच्या शारीरिक हावभावावरून व शाब्दिक आज्ञेने अंगावर उडी मारून, खांद्यावर पाय टाकून कपडे खराब करण्याचे बंद करतो. त्याला आपण जे शिकविले, त्याचा उपयोग झाला म्हणून आपल्यासही आनंद होतो. मात्र त्यासाठी चिकाटी ही हवीच. श्वानाच्या बुध्दिमत्तेनुसार तो ताबडतोब ऐकणार नाही हे आपण सतत ध्यानात ठेवले पाहिजे.

श्वानांची आणखी एक वाईट सवय म्हणजे घरातल्यांचे चपला बूट चावणे. लहानपणी पिलाला आपण घरात आणल्यावर त्याच्याकडे फारसे लक्ष न दिल्याने किंवा त्याला घरात मोकळे सोडले असता त्याचे दात शिवशिवत असल्याने दिसेल ती वस्तू तोंडात घालून चघळण्याचा वा चावण्याचा ते प्रयत्न करते. हे एवढ्यावरच न थांबता कुंडीतील झाडांची पाने कुरतडणे, स्कूटर, मोटारीचे टायर फाडणे, कपडे वा वृत्तपत्र फाडणे असे त्यांचे उद्योग चालूच राहतात. श्वानांची ही सवय लक्षात आल्यावर त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवून ते मोकळे असतानाच त्याच्यावर नजर ठेवणे आवश्यक ठरते. या श्वानांना मोकळे न ठेवता त्यांना त्यांच्या पिंजऱ्यात ठेवावे. ठराविक वेळेनंतर त्यांना आपल्या नजरेसमोरच बाहेर सोडावे. सुरुवातीला त्यांच्यासोबत खेळावे. त्यांना थकवावे. म्हणजे मग ते शांत होतात व अशा हरकती करणे कमी होते. ज्यांचे दात शिवशिवतात, त्यांना दातांना व्यायाम म्हणून चघळण्याचे हाड दिले की ते हाड चघळतात व शांत होतात. असे हाड त्यांच्याजवळ १५-२० मिनिटे ठेवावे व नंतर उचलून दूर ठेवावे, नाहीतर त्यांचा हाड चघळण्यातील उत्साह कमी होतो.

पिलांना सुरुवातीला शी-शू कुठे करावी ते समजत नाही. ती घरात वा त्यांना ठेवले असेल तेथे कुठेही घाण करतात. श्वानपालकाला मग तेथे स्वच्छता करावी लागते. पिलांनी कोठेही घाण करू नये यासाठी ती झोपेतून उठल्यावर तसेच जेवण दिल्यावर त्यांना त्वरित घराच्या बाहेर घाणेरड्या जागी घेऊन जावे. मग तेथे पिले शी-शू करतात. नंतर ठराविक कालावधीनंतर दोन तीन तासांनंतर त्यांना पुन्हा बाहेर घेऊन जावे लागते. पिले मोठी झाल्यावर या विधीची त्यांनाही समज येते. बाहेर काढल्यावर ठराविक ठिकाणी ती हे नैसर्गिक विधी उरकतात. सुरुवातीला मात्र त्यांना बाहेर घेऊन जाण्यात सातत्य ठेवावे लागते. त्यांना बाहेर न नेल्यास मात्र ती हे विधी घराच करण्याची शक्यता असते. अर्थात समज आल्यावर ती पालकाला विशिष्ट पध्दतीने भुंकून सांगतातही. त्यानंतर त्यांना मोकळे सोडणे मात्र आवश्यक आहे, त्याशिवाय ती नैसर्गिक विधीसाठी जाऊही शकणार नाहीत. त्यांना मोकळे केल्यावर विशिष्ट ठिकाणी जुन्या वासावरून जाऊन त्यांचे विधी उरकतात. ज्या ठिकाणी त्यांनी विधी करू नये त्या ठिकाणी विधी केल्यास ती घाण काढून फिनाईलसारखे द्रव वापरून ती जागा स्वच्छ करावी म्हणजे पुन्हा ती नैसर्गिक विधीसाठी त्या जागी जाणार नाहीत.

हल्ली शहरातील लहान जागांमुळे श्वानांच्या वावरण्यावर मर्यादा येतात. त्यामुळे त्यांना काही वाईट सवयी लागण्याची शक्यता असते. सोफ्यावर चढून बसणे, पलंगावर चढणे, घरातील अन्न उघडे असल्यास खाणे, मालकाचा हात तोंडात धरून खेळणे-चघळणे, खूप मस्ती करणे, मालकाचे न ऐकणे, एखादी वस्तू तोंडात धरून पळत सुटणे, जवळ न येणे, काही कारण नसताना भुंकत सुटणे इ. श्वानांच्या सवयी त्रासदायक ठरू शकतात. या सवयी लक्षात आल्याबरोबर त्याला त्या करण्यास शारीरिक प्रतिबंध करावा. ती कृती न करू देता आपल्याला हवे तसे त्याला वागायला लावावे. प्रसंगी श्वान प्रशिक्षकाची मदत श्वानपालकांनी घ्यावी.